# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/उद्यान/मिरारोड/मा.अ./ ०४ /२०२३-२४ दिनांक :१९ /०४/२०२३

माहितीचा अधिकार

प्रति,
श्री.जय श्रुंगारपुरे
१ रिझवी निकेतन,
सिटी लाईट सिनेमा मागे,
गोपी टँक माहिम मुंबई -४०००१६

**विषय :- केंद्र शासन माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये सिद्धिविनायक नगर,महाजनवाडी मिरारोड येथील राज रिऍलिटी आय-क्लास या प्रकल्पा संदर्भात माहिती मिळणे बाबत.**
**संदर्भ :- आपला दि. ०२/०३/२०२३ रोजीचा अर्ज.**

केंद्र शासन माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये मिरारोड (पु) सिद्धिविनायक नगर,महाजनवाडी मिरारोड येथील राज रिऍलिटी आय-क्लास या प्रकल्पा संदर्भात सविस्तर माहिती मिळणेबाबत संदर्भिय पत्र प्राप्त झालेले आहे.

त्यानुसार या विभागात असलेले अभिलेख तपासले असता खालील प्रमाणे माहिती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विषय | उत्तर |
|---|---|---|
| १ | सदर जागेत किती वृक्ष आहे. वृक्षांना कापण्याची,तसेच किती वृक्षांना स्थंलातरण करण्याचे आदेश/ परवानगी मिळाली होती. | सोबत परवानगी प्रत जोडलेले आहे. |
| २ | वृक्ष कापण्यात आलेल्या वृक्षांपैकी/ दुसऱ्या ठिकाणी किती वृक्ष लावण्याचे आदेश दिलेला आहे. तसेच नियमाप्रमाणे सहा –सहा महिन्याच्या अंतरावर तीन वर्षे केलेल्या प्लांटेशनचे छायाचित्रे महानगरपालिकेला सादर केलेल्या फोटोची प्रत मिळावी | अनुक्रमांक -१ प्रमाणे |
| ३ | वृक्ष कुठे स्थलांतरीत केलेली आहे. त्या जागेच्या फोटो ची प्रत मिळावी | वृक्ष स्थलांतरीत करण्यात परवानगी देण्यात आलेली नाही. |
| ४ | विकासद्वारे जी वृक्ष कापली गेली आहेत त्या ऐवजी शासन नियमाप्रमाणे त्यांनी दुसऱ्या ठिकाणी लावण्यात आलेल्या नविन वृक्षांचे फोटोस व जागेची माहिती मिळावी. | |

(नागेश विरकर)
**जन माहिती अधिकारी तथा**
**उप.मुख्य उद्यान अधिक्षक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# पहा नियम ६ (१)
# महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००५

मिरा भाईंदर महानगरपालिका
उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग
प्रभाग समिती क्र. ४, ५ व ६
आवक क्र. 93 दि. 02/03/2023
2022-23
उप. मुख्य उद्यान अधिक्षक

प्रति,
शासकीय माहिती अधिकारी,
उद्यान विभाग,
मीरा भाईंदर महानगरपालिका.

| | | |
|---|---|---|
| **अर्जदाराचे नाव** | : | श्री. जय शृंगारपुरे |
| **पत्ता** | : | १, रिझवी निकेतन, सिटीलाईट सिनेमा मागे, गोपी टँक मार्ग, माहीम, मुंबई - ४०००१६. |
| **मोबाईल नंबर** | : | ९८२० २२ १७८३ |
| **आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील** | : | सिद्धिविनायक नगर, महाजन वाडी, मीरा रोड येथील, **राज रिऍलिटी आय-क्लास** या प्रकल्पा संदर्भात माहिती मिळणे बाबत.. |

१. सदर जागेवर किती वृक्ष होते आणि त्यात किती वक्षांना कापण्याची, तसेच किती वृक्षांना स्थलांतरण (ट्रान्सप्लांट) करण्याचे आदेश / परवानगी मिळाली होती त्याची माहिती सत्यप्रति करून मिळावी.

२. त्यांनी कापण्यात आलेल्या वृक्षांपैकी / ऐवजी दुसऱ्या ठिकाणी किती वृक्ष लावण्याचे आदेश दिला आहे. तसेच नियमा प्रमाणे सहा-सहा महिन्याच्या अंतरावर तीन वर्षे केलेल्या प्लांटेशनचे छायाचित्रे महानगरपालिकेला सादर केलेल्या फोटोची प्रत मिळावी

३. वृक्षे कुठे स्थलांतरीत (ट्रान्सप्लांट) केलेली आहेत त्या जागेच्या फोटो ची प्रत मिळावी.

४. विकासकाद्वारे जी वृक्ष कापली गेली आहेत त्या ऐवजी शासन नियमाप्रमाणे त्यांनी दुसऱ्या ठिकाणी लावण्यात आलेल्या नवीन वृक्षांचे फोटोस व जागेची माहिती मिळावी.

**विशेष: वरील सर्व पुरावे / माहीती सत्यप्रती करून मिळावे.**

| | |
|---|---|
| माहिती संबंधित कालावधी | **संबंधित कालावधी** |
| माहिती टपालाद्वारे की व्यक्तिशः आवश्यक आहे | **व्यक्तिशः** |
| ज्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन | **स्वतःच्या माहितीकरिता** |

ठिकाण: **मुंबई**
दिनांक: **२४ फेब्रुवारी २०२३**




(जय शृंगारपुरे)

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग
प्रभाग समिती क्र. ४, स्व. विलासराव देशमुख भवन, कनकिया,
मिरारोड (पूर्व), ता.जि. ठाणे - ४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

जा.क्र./मनपा/वृ.प्रा./मिरारोड/ 431 /2020-21

दिनांक: 30/12/2020

प्रति,
मे. राज होम्स,
मिरारोड(पुर्व)

विषय – विकासकामात (नविन इमारत बांधकामात) बाधित होणारी झाडे मुळासहित काढणेबाबत.

संदर्भ – 1) आपले दि.21/10/2020 रोजीचे पत्र प्राप्त दि.22/10/2020.
2) जा.क्र./मनपा/नर/3541/2013-14 दि.13/12/2013 अन्वये बांधकाम प्रारंभपत्र.
3) मा. आयुक्त सो यांची दि. 10 /12 /2020 रोजीची मान्यता.
4) जा.क्र.मनपा/वृ.प्रा./मिरारोड/ 428 /2020-21 दि.28 /12/2020 रोजीचे अनामत रक्कम भरणेबाबतचे पत्र.
5) दि. 30 / 12 /2020 रोजीची पावती क्र.1481/14801 व पावती क्र. 7/17780

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पुर्व), मौजे महाजनवाडी/पेणकरपाडा सर्वे क्र. मौजे महाजनवाडी नविन 54/11,12,19 जुना 127/11,12,19 मौजे पेणकरपाडा सर्वे क्र. नविन 72 पौ. जुना 237पै या जागेतील 07 नग सुबाभुळ अंदाजे 25 ते 28 फुट, 02 नग रेन्ट्री अंदाजे 28 ते 30 फुट व 07 नग जंगली अंदाजे 25 ते 28 फुट उंच अशी एकुण 16 नग झाडे इमारतीच्या बांधकामामध्ये अडथळा निर्माण करीत आहेत. वरिल संदर्भ क्र. 01 नुसार झाडे मुळासहित काढणेबाबत परवानगी मागितलेली असुन इमारतीच्या प्लिंथ बांधकामामध्ये एकुण 16 नग झाडे इमारतीच्या बांधकामामध्ये अडथळा निर्माण करीत असुन झाडे मुळासहित काढणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 महाराष्ट्र(नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन नियम, 2009 सहशासन आदेश, अधिसुचना चे प्रकरण 8 कलम1 व मा.वृक्षप्राधिकरण सभा ठराव क्र.6 दि.16/08/2014 अन्वये 01 झाडाच्या बदल्यात 05 झाडे लावण्याच्या अटीनुसार 16 झाडांच्या बदल्यात नविन 80 झाडे लावण्याच्या अटीवर सदरची 16 झाडे मुळासहित काढणेस खालील अटीशर्तीनुसार परवानगी देण्यात येत आहे.

अटी व शर्ती

1) सदरची झाडे स्वखर्चाने व स्वनिर्णयाने मनुष्यबळ उपलब्ध करुन तोडुन घेणे महानगरपालिका कोणत्याही प्रकारची साधन सामग्री पुरवणार नाही.झाडाच्या फ़ांद्या,लाकडे रस्त्यावर फ़ेकण्यात येऊ नये.
2) झाडे कापताना काही अपघात झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी आपली राहिल.(उदा.जिवित हानी, वित्तहानी वाहनाचे अपघात)
3) जागेसंबधी काही वाद उद्भवल्यास व प्रकरण न्यायप्रविष्ट झाल्यास ते सोडवण्याची जबाबदारी आपली राहील.महानगरपालिका कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करणार नाही.
4) झाडे तोडताना कोणत्याही नागरींकानी पुर्वपरवानगी शिवाय विचारणा केल्यास सदर परवानगीची माहिती देणे बंधनकारक आहे
5) भविष्यात जमिनिचा विकास करावयाचा असल्यास जमिनिच्या प्रति 100 स्के.मी. ला 02 झाडे याप्रमाणे एकुण क्षेत्रफळानुसार नविन झाडे लागवड करण्याची व त्या अगोदर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दराप्रमाणे अनामत शुल्क भरणा करणेची जबाबदारी आपली राहील व त्यासंबंधी जे काही शासकीय नियम लागु असतील ते नियम आपणांवर बंधनकारक राहणार आहेत.

H.S.M.
(हंसराज मेश्राम)
प्र.उप-मुख्य उद्यान अधिक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका